महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक:-तंशिस/शैवि/महाडीबीटी/शिष्य./२०२४-२५/ 114-4 दिनांक:- 26 MAR 2025

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- शिष्यवृत्तीस अपात्र असलेल्या अर्जाबाबत.**

तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत महाडिबीटी पोर्टलवरील राबविण्यात येणा—या योजनांतर्गत शिष्यवृत्तीस पात्र नसलेले अर्ज विभागीय लॉगीन ला पाठविल्यास, संबंधित संस्थेला पुर्व सुचना न देता अपात्र अर्ज थेट RO Login मधून नामंजूर (Reject) करण्यात येईल. याबाबत आपणास पत्राव्दारे वारंवार कळविण्यात आलेले असून सुद्धा काही संस्थांनी शिष्यवृत्तीस अपात्र असलेले अर्ज मंजूरी करिता पाठवित असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

याअनुषंगाने सर्व संस्थांना सुचित करण्यात येते की, शिष्यवृत्तीस अपात्र असलेले अर्ज (जसे- १. EBC Scheme मध्ये Against Cap, TFWS Admission, २. Hostel Scheme मध्ये Against Cap admission ३. Minority Scheme मध्ये TFWS admission, ) विभागीय लॉगीन ला पाठविल्यास, सदर अर्ज विभागीय कार्यालयामार्फत Revert न करता थेट नामंजूर (Reject) करण्यात येईल. **ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज Reject करण्यात आलेले आहे. त्या विद्यार्थ्यांना संस्थांस्तरावरुन अवगत करण्यात यावे. ( विद्यार्थ्यांची यादी संस्थेच्या लॉगीन ला उपलब्ध आहे.)**

तसेच, संस्थेने विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करतांना विद्यार्थी, हा आपल्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थी आहे की नाही, या करिता विद्यार्थ्यांचे प्रवेशित कॅप लेटर मधील संस्थेचे नांव तसेच विद्यार्थ्यांच्या प्रोफाईल मधील संस्थेचे नांव तपासणी करूनच अर्ज मंजुरीस्तव पाठविण्यात यावे. जर चुकीच्या संस्थेमधून अर्ज पाठविल्यास, आणि या कारणामुळे विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी ही, स्व:त विद्यार्थी, तसेच **ज्या संस्थेतून अर्ज forword झाला. त्या संस्थेतील प्राचार्य व शिष्यवृत्ती हाताळणा-या अधिकारी / कर्मचारी यांची राहील.**

**(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर